# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/11/2023 (रविवार) दुपार

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत रमा दंडारे हिचे घरासमोर पारडसिंगा काटोल येथे दिनांक ०४/११/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– चरणदास वसंतरावजी तागडे, वय ४० वर्ष, रा. पेठबुधवार पारडसिंगा काटोल याचा मित्र मृतक नामे मंगेश अशोकराव गायकवाड, वय ३२ वर्ष, रा. पारडसिंगा याचा व आरोपी नामे– ज्ञानेश्वर वानखेडे, रा. पारडसिंगा काटोल याचा आपसात झगडाभांडण सुरू असता यातील फिर्यादी हा त्यांचा वादविवाद सोडविण्याकरीता गेला असता यातील आरोपीने कोणत्यातरी धारदार शस्त्राने मंगेश गायकवाड याच्या छातीवर मारून जिवानीशी ठार केले व यातील फिर्यादी आरोपीस पकडण्याकरीता गेला असता त्याला सुध्दा त्याच शस्त्राने मारून गंभीर जखमी केले व तेथुन पळुन गेला. फिर्यादीचा पुढील वैद्यकीय उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, ३०७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम मो. नं. ८३८००७२२३६ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. बेला :– अंतर्गत ०९ किमी अंतरावर सोनेगाव शिवार नॅशनल हायवे क्र. ४४ वर यातील मृतक नामे–संतोष गनपत कडीनाहाके, वय ४३ वर्षे रा. दोंडके गोदीया ह. मु. कळमना ता. सिंदी रेल्वे जि. वर्धा हा दिनांक ०३/११/२०२३ चे सायंकाळी ०६/४५ वा. चंद्रपुर ते नागपुर रोडनी सोनेगावकडे पायदळ येत असता चंद्रपुर कडुन नागपुरकडे जाणारा अज्ञात पांढऱ्या रंगाची ब्रेजा गाडी चालकाने मृतकास मागुन ठोस मारली त्यामुळे मृतकाच्या डोक्याला दोन्ही पायाला आणि डाव्या हाताला मार लागल्याने त्यास उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचार करीत असता दि. ४/११/२०२३ रोजी सकाळी ०५/१५ वा. उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे–पोलीस नायक निलकंठ पोस्टे बेला यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजय चौधरी पोस्टे बेला मो. नं. ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर